# प्रवेशानंतर पाळावयाची शिस्त व बंधनकारक नियम

## ❖ महाविद्यालयातील उपस्थिती :

१) उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या / डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या परीक्षेला बसण्यास पात्र होण्यासाठी विद्यार्थ्याने प्रत्येक विषयाच्या किमान ७५% तासिकांना उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

२) आजारपणामुळे किंवा अन्य काही अडचणींमुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास संबंधित अधिव्याख्यात्यांची किंवा प्राचार्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

३) जे विद्यार्थी पूर्वपरवानगीशिवाय वारंवार अनुपस्थित राहतील अशा विद्यार्थ्यांच्या पालकांना त्यासंबंधी कळविले जाईल.

४) अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची उपस्थिती प्रथम सत्राच्या अखेर सुधारल्याचे न आढळल्यास द्वितीय सत्राच्या सुरूवातीस हजेरीपटावरून नाव कमी करण्यात येईल.

५) महाविद्यालयाकडून घेतल्या जाणाऱ्या सत्र परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची उपस्थिती अनिवार्य आहे. परीक्षेस अनुपस्थित राहणे हे बेशिस्तीचे वर्तन समजले जाईल.

६) कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची उपस्थिती प्रथम सत्राच्या अखेरीस न सुधारल्याचे निदर्शनास आल्यास द्वितीय सत्राच्या सुरुवातीस त्याचे नाव हजेरीपटावरुन कमी करण्यात येईल.

७) वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची उपस्थिती विद्यापीठाच्या नियमानुसार प्रत्येक सत्रात ७५ टक्के असणे बंधनकारक आहे. अन्यथा अशा विद्यार्थ्यांना परिक्षेस बसू दिले जाणार नाही.

८) वरिष्ठ महाविद्यालयातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रत्येक सत्रात, प्रत्येक विषयाच्या प्रत्येक पेपरची एक घटक चाचणी व एक असाइनमेंट देणे उत्तीर्ण होण्यासाठी अनिवार्य आहे.

## ❖ शिस्त पालन आणि गणवेश:

१) महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याने स्वत:जवळ महाविद्यालयाने दिलेले चालू वर्षाचे ओळखपत्र बाळगणे आवश्यक आहे. अधीक्षक/प्राचार्य/प्राध्यापक तसेच महाविद्यालयीन कर्मचारी यांनी ओळखपत्र मागितल्यास ते सादर करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक आहे.

२) वर्ग चालू असतांना वर्गासमोरील व्हरांड्यातून फिरण्यास व इतरांना भेटण्यास सक्त मनाई आहे. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर, पायऱ्यांवर किंवा परिसरातील कठड्यावर बसू नये.

३) रिकाम्या तासात विद्यार्थ्यांनी वाचन कक्षात बसावे.

४) महाविद्यालयात गोंधळ करणे किंवा शांततेचा भंग करणे यासाठी कडक शिक्षा होईल. विद्यार्थ्यांनी फर्निचरची हलवाहलव, मोडतोड करू नये तसेच कुणीही बाकावर, भिंतीवर वा फलकांवर कोणताही मजकूर लिहू नये.

५) प्रयोगशाळेत प्रयोगाकरीता स्वाधीन करण्यात आलेल्या साहित्याबद्दल वैयक्तिकरीत्या विद्यार्थी जबाबदार राहील. अयोग्य कारणासाठी झालेली तूटफूट भरून द्यावी लागेल.

६) महाविद्यालयाच्या आवारात वाहन स्थानकाची व्यवस्था आहे. या जागेव्यतिरिक्त महाविद्यालयाच्या इतर ठिकाणी विद्यार्थ्यांना कोठेही सायकल, स्कूटर, मोटारसायकल ठेवता येणार नाही.

७) वर्ग सुरू असताना मोबाईल वापरण्यास सक्त मनाई आहे.

८) रॅगिंगविरोधी कारवाई : महाविद्यालयात व महाविद्यालयाच्या परिसरात रॅगिंग व रॅगिंगशी संबंधित कोणत्याही प्रकारचे वर्तन करताना आढळल्यास संबंधित विद्यार्थी / विद्यार्थिनींवर मा. सर्वोच्च न्यायालयाने डॉ. राघवन समितीच्या अहवालाआधारे दि. ११/०२/२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार कारवाई करण्यात येईल.

९) <u>मुलांनी पांढरा शर्ट व गडद निळी पँट या गणवेशात यावे. मुलींनी पांढरा शर्ट / कमीज व गडद निळी पँट / सलवार या गणवेशात यावे. महाविद्यालयात गणवेशात येणे बंधनकारक आहे.</u>

## ❖ शिस्तपालनाच्या नियमांचा भंग केल्यास :

१) नियमभंगाच्या गुन्ह्याची नोंद केली जाईल.

२) पालकांशी संपर्क साधला जाईल.

३) दंड आकारला जाईल.

४) विद्यार्थी महाविद्यालयीन सवलती मिळण्यास अपात्र ठरेल.

५) प्रवेश रद्द करून पुढील वर्षी महाविद्यालयात प्रवेश दिला जाणार नाही.

६) नियमभंगाचे स्वरूप लक्षात घेऊन कोणती शिक्षा द्यावयाची ते ठरविले जाईल.

## प्रवेश घेतांना खालील मुद्दे लक्षात घ्यावेत.

१) महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने पूर्व परीक्षेचा निकाल लागल्यानंतर दहा दिवसांच्या आत ठराविक नमुन्यात अर्ज करावा. अकरावी (कला/विज्ञान) आणि प्रथम वर्ष (बी.ए./बी.एस्सी.) वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी छायाचित्र लावलेला अर्ज पूर्ण करून योग्य त्या कागदपत्रांच्या सत्यप्रतींसह कार्यालयात आवश्यक त्या नोंदणी शुल्कासहित (Registration Fee) सादर करावा. निवड यादी प्रसिद्ध झाल्यावर मूळ कागदपत्रांसह प्रवेश समितीपुढे स्वत: हजर राहून आवश्यक ते शुल्क भरून प्रवेश पूर्ण करावा.

२) माहितीपुस्तिका कार्यालयीन वेळेत मिळेल.

३) प्रवेश अर्जातील माहिती कोणतीही खाडाखोड न करता स्वअक्षरात भरावी.

४) निवडलेले विषय सबळ कारणाशिवाय बदलता येत नसल्यामुळे विद्यार्थ्यांनी आपले विषय विचारपूर्वक निवडावेत.

५) विषय बदलासाठी प्रवेश घेतल्यापासून एक महिन्याच्या आत प्राचार्यांच्या नावाने अर्ज करावा व संबंधित वर्गाच्या प्रवेश समितीच्या प्रभारी प्राध्यापकाची व विभागप्रमुखाची शिफारस घ्यावी व त्यास प्राचार्यांची मान्यता आवश्यक असेल.

६) प्रवेश अर्जावर विहित जागी विद्यार्थ्याने अलीकडच्या काळातील आपले छायाचित्र चिकटवावे.

७) राखीव जागेवर प्रवेश हवा असल्यास 'राखीव जागेसाठी अर्ज' असा स्पष्ट उल्लेख प्रवेश अर्जाच्या वर लिहावा.

८) नोंदणीसाठी प्रवेश अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रत्येकी दोन सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

अ) शाळा किंवा महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र (T. C.)

ब) मागील परीक्षेची गुणपत्रिका (Marks Memo)

क) मागासवर्गीय असल्यास जातीच्या प्रमाणपत्राची (Caste Certificate) सत्यप्रत.

ड) पात्रता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) मिळविण्यासाठी विद्यापीठाकडे करावयाचा अर्ज (फक्त बी.ए./बी.एस्सी.प्रथम वर्षासाठी आवश्यक)

इ) दोन ''पासपोर्ट आकाराचे'' फोटो

९) ज्या विद्यार्थ्यांनी माध्यमिक शालांत परीक्षा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक परीक्षा मंडळाऐवजी अन्य मंडळामार्फत दिलेली असेल तर अशा विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ, औरंगाबाद, यांच्याकडून पात्रता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) घेऊन प्रवेश समितीस सादर करावे.

१०) आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या मूळ प्रती / सत्य प्रती जोडलेला व संपूर्ण तपशील भरलेला प्रवेश अर्ज संबंधित वर्गाच्या प्रवेश समितीच्या लिपिकाकडे सादर करून पोच पावती घ्यावी.

११) महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळाच्या शिवाय इतर कोणतीही मान्यताप्राप्त परीक्षा उत्तीर्ण केली असल्यास विद्यार्थ्याला अंतिम प्रवेशासाठी स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) ३० दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

१२) महाविद्यालयात प्रोव्हिजनल प्रवेश घेतांना आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती द्याव्या लागतील.

वरील मुद्द्यांची पूर्तता झालेली नसल्यास प्रवेश नाकारण्याचा हक्क प्राचार्यांना राहील.